# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/01/2023 (शनिवार) सकाळ

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील धानला येथे दिनांक ०६/०१/२०२३ चे ११.१० वा. ते १२.१० वा. दरम्यान मौदा पोलीस पथक यांना गोपनीय माहीती मिळाली की, धानला येथे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरून मौदा पोलीस पथकाने पेट्रोलिंग दरम्यान नमुद घटनास्थळी जावुन यातील आरोपी नामे— राधेशाम दयारामजी गुळेवार, रा. वेकेश्वर मौदा हा आपल्या स्वराज कंपनीचा ८५५ एफ ई ट्रॅक्टर क्रमांक एम. एच.— ४०/सी.ए—५३३३ मध्ये विनापरवाना रेती भरून अवैद्यरीत्या चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने ८५५ एफ ई ट्रॅक्टर क्रमांक एम. एच.— ४०/सीए—५३३३ किंमती अंदाजे ४०००००/—रू. व १ ब्रास रेती किंमती अंदाजे २०००/—रू. असा एकुण ४०२०००/— रूपयाचा मुद्देमाल वाहनासह जप्त केला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे—पोलीस हवालदार यंगलवार ब. नं. ११७४ पोस्टे मौदा यांच्या रिपोर्टवरून पोस्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक प्रितम पिंपळकर या करीत आहे.

**२) पो.स्टे. कुही** :— अंतर्गत २२ कि. मी. अंतरावरील मौजा दुरक्षेत्र पाचगाव परीसरातील ठेवलेले खुले जागेवरील टिप्पर येथे दिनांक ०५/०१/२०२३ चे ०५.१५ वा. दरम्यान कुही पोलीस पथक यांना गोपनीय माहीती मिळाली की, नमुद ठिकाणी अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरून कुही पोलीस पथकाने पेट्रोलिंग दरम्यान नमुद घटनास्थळी जावुन पाचगाव चौकी येथे ठेवलेला टिप्पर क्र एम. एच.—३५ ऐ.के —५४१४ किंमती अंदाजे १५,०००००/—रू. व सहा ब्रास रेती किंमती अंदाजे १८,०००/— असा एकुण १५,१८०००/—रूपयाचा मुद्देमाल ट्रक चालक आरोपी नामे १) कार्तीक कैलास कन्नाके, रा. पानतावने नगर, हिंगना २) टिप्पर मालक बिना शंकर शाहु, रा. पिंपळफाटा नागपुर यांनी संगणमत करून पो.स्टे. कुही दुरक्षेत्र पाचगाव चे आवारातील खुले जागेवरून चोरून घेवुन गेल्याने सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— सहायक फौजदार ब. नं. १५८९ संजय कुलकर्णी पो.स्टे. कुही यांच्या रिपोर्टवरून पोस्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठमके पो.स्टे. कुही मो.नं. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**